# BDC LIBRARY

New Paper Clipping

A.Y. 2024-2025

# पाटणमध्ये जागतिक युवा दिनानिमित्त रक्तदान शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाटण :** कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण संचलित बाळासाहेब देसाई कॉलेज एनएसएस विभाग व रोटरी क्लब पाटण एनसीसी विभाग तसेच आयक्यूएसी विभाग यांच्यातर्फे जागतिक युवा दिनानिमित रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. डी. पवार होते. यावेळी रोटरी क्लबच्या सचिव शीलादेवी पाटणकर, प्रा. बी. एन. पाटील, जयदीप फुटाणे, प्रा. डॉ. एच. व्ही काटे, प्रा. डॉ. जी. एस. पट्टेबहादूर, प्रा. बजरंग चव्हाण हे उपस्थित होते.

संजीव चव्हाण म्हणाले, 'रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदानामुळे लोकांचे प्राण वाचतात याशिवाय रक्तदात्यासही त्याचे आरोग्य सुदृढ राहण्याचे फायदे मिळतात. रक्तदान केल्याने तुमच्या हृदयाचे आरोग्य सुधारते.'

प्राचार्य डॉ. एस. डी. पवार म्हणाले, 'सगळ्यांनी रक्तदान केले पाहिजे. महाविद्यालयात दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित करून जनजागृती केली जाते. त्याचबरोबर रक्तदानामुळे आरोग्यदायी फायद्याबरोबरच रक्ततपासणी केली जाते. आरोग्याची तपासणी केली जाते याचबरोबर रक्तातील हिमोग्लोबिनची पातळी तपासली जाते असे अनेक फायदे आपणास रक्तदान केल्यामुळे होत असतात.'

या कार्यक्रमाचे डॉ. जी. एस. पट्टेबहादूर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. बी. ए. चव्हाण यांनी आभार मानले. प्रा. डॉ. भरत जाधव, डॉ. एस. पी. पाटील, प्रा. एल. जी. गणगे, डॉ. निमजे प्रा. सुमित लाड, प्रा. ए. ए. सूर्यवंशी, प्रा. दीपाली कीर्तावडे, प्रा. व्ही. आर. शिर्के, प्रा. व्ही. एस. कांबळे, प्रा. एस. डी. कदम, प्रा. आर. के. शिर्के उपस्थित होते.